## बहावा

***Cassia fistula* L.** **Family. - Caesalpiniaceae**





**विविध भाषांमधील नावे:**
संस्कृत: आरग्वध, राजवृक्ष, शंपाक; मराठी: अमाल्टस, बहावा, कन्नड: अरागू, कक्के; इंग्लिश: गोल्डन शॉवर ट्री, इंडियन लॅबर्नम.

**Morphology:**
Deciduous moderate sized trees. Leaflets 4-8 pairs, ovate, coriaceous. Flowers in lax drooping racemes. Corolla bright yellow; petals subequal. Stamens 10, all perfect. Pods cylindric, straight or slightly curved, black. Seeds many, dark brown, polished.

**वनस्पतीचे वर्णन:**
मध्यम् आकाराच्या य वृक्षाला भरपूर फान्द्या असतात. खोड गुळगुळीत, फिकट करड्या रंगाचे असते. पाने संयुक्त प्रकारची गडद हिरव्या रंगांची, नवी पालवी लालसर असते. पर्णिका लांब टोकदार जवळपास ४० सेंमी असतात. हिवाळ्यात वृक्ष पर्णहीन असतो. फुले गडद पिवळ्या रंगाची, सुगंधी, लोंबणाऱ्या असंख्य झुबक्यांमध्ये येतात. फुलांमध्ये पुष्परस पुष्कळ असल्यामुळे भुंगे व विविध कीटक फुलांवर गर्दी करतात. फुलांच्या सोनेरी रंगामुळे हा वृक्ष 'Golden shower tree' म्हणून ओळखला जातो. बहाव्याचे फुलोरे अर्धा हात लांब आणि लोंबणारे असतात. फुलांच्या परागीभवनानंतर वाटोळ्या पण लांबलचक शेंगा तयार होतात. शेंगेत अनेक आडवे कप्पे असतात आणि प्रत्येक कप्प्यात मऊ गरातहिवाळ्यात फुले येण्याच्या कालावधीमध्ये पानगळ होते . साधारणपणे उन्हाळ्यात गडद काळ्या चॉकलेटी लांब, भरपूर गर असणाऱ्या शेंगा येतात. एका शेंगेमधे साधारणपणे ४० - १०० चपट्या, बदामी बिया असतात. शेंगामधील गर गोड असल्यामुळे खारीसारखे प्राणी या वृक्षावर आढळून येतात.

**बहर येण्याचा कालावधी :**एप्रिल आणि मे

**औषधी उपयोग:**
आयुर्वेदिक औषधांमध्ये साल, पाने, फुले, शेंगा यांचा वापर केला जातो. गजकर्ण, कुष्ठ, खरूज, नायटा यांसारख्या त्वचाविकारांवर पानांचा वापर केला जातो. फळांचा उपयोग रेचक, पित्त, कफ, रूचीवर्धक, हृिदयरोगावर केला जातो. जास्त पिवळेपणा असलेल्या काविळीत आधी दोन-तीन दिवस रोज सकाळी १५ ते २० मिलिलिटर तूप देऊन तिसऱ्या दिवशी रात्री जेवणानंतर आरग्वध (बहावा/ अमलताश)-मगज १५ ते २० ग्रॅम पाण्याबरोबर देतात. आरग्वधाचा मगज हा पदार्थ गाभुळेल्या चिंचेसारखा असतो. त्याच्या सेवनामुळे सौम्य जुलाब होऊन अन्नमार्गातले पित्त पडून जाते. शेंगेतला गर सारक औषध म्हणून उपयोगी आहे, तसेच तंबाखूला स्वाद आणण्यासाठी गर वापरतात.

**लागवड:**
या वृक्षाची लागवड बियांपासून केली जाते. बिया १०० टक्के रुजण्यासाठी उकळत्या पाण्यामध्ये ठेवल्या जातात व रात्रभर भिजवून ठेवल्या जातात. याचबरोबर सल्फ्युरिक आम्ल, घर्षण, पंक्चरिंग या पद्धतींचा सुद्धा वापर केला जातो. सुरवातीला रोपे पिशव्यांमध्ये तयार केली जातात साधारणपणे एक वर्षानंतर ही रोपे पुनर्लागवाडीसाठी किंवा थेट जमिनीमध्ये लावण्यासाठी वापरली जातात. बहुतांशी याची रोपे रस्त्याचा किंवा बागांमध्ये लावली जातात. सर्वसाधारणपणे ५ वर्षानंतर फुले येण्यास सुरवात होते.
वनस्पतिचे अनेक उल्लेख रामायन, ऋग्वेद यासारख्या प्राचीन साहित्यमधे पाहायला मिळतो. सुन्दर सोनेरी फुले असणार हा वृक्ष हिमालयापासून ते कन्याकुमारि पर्यन्त सर्वत्र पसरलेला आहे. शहरी भागात शोभिवन्त वृक्ष म्हणून मोठ्या प्रमाणात लवला जातो.